पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑगस्ट २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : गणेश सुभाष खांडेकर

२)पदनाम : पोलीस शिपाई

३)बक्कल नंबर : 8814

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पो. स्टे. पुणे

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पन या पुस्तकातील माहिती पोलिसांसाठी खुप छान लिहिलेली आहे, या पुस्तकात पोलीस कायद्याबद्दलची माहिती वाचायला मिळते तसेच पोलिसांनी केलेली काम यांची माहिती दर्पण या पुस्तकातुन अतिशय समर्पक रित्या सांगितलेली आहे.

तसेच या पुस्तकातील माहिती ही आमच्यासाठी तसेच आमच्या कामात तिचा चांगला उपयोग होत असुन ती अतिशय महत्वाची आहे.

दिनांक 24/08/2019

स्वाक्षरी PC 8814

---

प्रति,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
विश्रांतवाडी पो. स्टे. पुणे शहर

प्रतिवेदक :- एम.डी. निंबाळकर [?] म.पो उप.निरीक्षक.
विश्रांतवाडी पो. स्टे. पुणे शहर.

विषय :- दर्पण पुस्तकाचे अभिप्राय बाबत.

=====o=====

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करते की मा. पोलीस आयुक्त पुणे शहर. यांनी त्यांचे संकल्पनेतुन प्रसार करण्यात आलेली 'दर्पण' पुस्तीकेचे आम्ही नियमीत वाचन करीत आहोत. त्यामुळे आम्हाला पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाविषयी बाबत. माहिती मिळुन त्याप्रमाणे कार्य करण्यात आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

आम्ही स्टेशन डायरी येथे [?] पोलीस ठाण्याकडील "दर्पण" पुस्तीका ही ठेवत असुन पो.स्टे येथे येणाऱ्या अर्जदार व नागरिकांनी वाचण्यास देऊन सदर पुस्तकेमुळे नागरिकांच्या मनात पोलीसांबाबत चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होत आहे.

मा. सादर व्हावे

म. पोलीस उप-निरीक्षक
वि. वाडी पो. स्टे पुणे.

# कारवाई

कारवाई

लोकमत – दि. १३ ऑगस्ट, २०१९

# बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करुन जप्त केली ३५० लिटर दारु

लोकमत न्यूज नेटवर्क

**बिबवेवाडी :** गंगाधाम चौकातून कोंढव्याच्या दिशेने जाणाऱ्या मोटार गाडीचा (एमएच १४ एच ८२५६) बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करुन त्यामधून वाहून नेली जाणारी ३५० लिटर हातभट्टी दारु अंदाजे किंमत १७५०० रुपयांची दारु जप्त करुन ताब्यात घेण्यात आली.

बिबवेवाडी पोलिसांचा बकरी ईदच्या निमित्ताने पेट्रोलिंग व बंदोबस्त सुरु असताना गंगाधाम रस्त्यावरुन कोंढव्याकडे जोरात जाणाऱ्या मारुती गाडीला चौकशीसाठी थांबण्यासाठी अडवले असता चालकाने घाबरुन गाडी जोरात पुढे नेली.

त्याच वेळी सहायक पोलीस फौजदार रोहित शिंदे व पोलीस शिपाई पुजारी यांनी गाडीचा पाठलाग करुन गाडी थांबवून तपासणी केली असता या गाडीत वेगवेगळ्या रंगाचे प्लॅस्टिक कॅन असल्याचे दिसून आले.



बिबवेवाडी पोलिसांनी हातभट्टी दारु वाहून नेणाऱ्या गाडीचा पाठलाग करुन वाहनचालकास पकडून हातभट्टी दारुचा साठा जप्त केला.

या कॅनमध्ये हातभट्टी दारु असल्याचा संशय आल्याने चालक कृपाल किशनदेव शर्मा (वय २६, रा. शेलारमळा कात्रज) याला ताब्यात घेऊन पोलीस पथक बोलावून पुढील तपासासाठी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात नेण्यात व वाहनचालकावर गुन्हा दाखल केला.

**लोकमत** – दि. ०८ ऑगस्ट, २०१९

# अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई

## गुन्हा दाखल : आठवड्यात ८ महिलांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात अनेक ठिकाणी रस्त्यावर उभे राहून अश्लील चाळे करुन पुरुषांना आकर्षित करुन वेश्या व्यवसाय करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढू लागले आहे. फरासखाना पोलिसांनी एक वेगळे पाऊल उचलले असून, भडक मेकअप करुन रस्त्यावर उभे राहून अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कलम २९४ अन्वये कारवाई करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यास सुरुवात केली आहे. या आठवड्यात अशा ८ महिलांवर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली आहे.

बुधवार पेठेत अनेक महिला रस्त्यावर उभ्या राहून वेश्या व्यवसाय करत असतात. त्यामुळे अशा रस्त्यावरुन जाण्यास महिला, तसेच पुरुषही टाळतात. या महिला भडक मेकअप करुन शरीराचा काही भाग अर्धवट उघडा ठेवून येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांकडे पाहून हातवारे करणे व अश्लील चाळे करतात. अनेकदा अश्लील बोलताना आढळतात.

याबाबत फरासखाना पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर नावंदे यांनी सांगितले की, या परिसरात न राहणाऱ्या काही महिला बुधवार पेठेत रस्त्यावर थांबून वेश्या व्यवसाय करीत असल्याचे अनेकदा दिसून आले. त्यामुळे सार्वजनिक शांततेला बाधा येत असल्याने यापूर्वी पोलिसांनी अनेकदा त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे; मात्र त्याचा पुरेसा परिणाम दिसून येत नव्हता. त्यामुळे २९४ कलमान्वये त्यांच्यावर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. या आठवड्यात आतापर्यंत बुधवार पेठेतील वेगवेगळ्या ठिकाणी उभे राहून अश्लील चाळे करणाऱ्या ८ महिलांवर गुन्हे दाखल करुन त्यांना अटक केली आहे. या महिलांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे. बुधवार पेठेतील या बदनाम गल्लीत अशा महिला सहजपणे दिसून येतात.

**लोकमत** – दि. ११ ऑगस्ट, २०१९

# कुर्बानीचा बकरा लंपास करणाऱ्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** बकरी ईदच्या निमित्ताने कुर्बानी देण्यासाठी पाळलेला बकरा लंपास करणाऱ्यास समर्थ पोलिसांच्या गस्ती पथकाने अटक केली आहे. ताफिम बेग (रा. मंगळवार पेठ) असे बकरा चोरी करणाऱ्याचे नाव आहे.

हा चोरीचा बकरा सानियन जातीचा असून, त्याची बाजारात किंमत २५ हजार एवढी होती. चोरीच्या बकऱ्याची तो बाजारात विक्री करणार होता. मात्र त्या अगोदरच पोलीस त्याच्यापर्यंत पोहचले आणि त्याचा डाव फसला.

याप्रकरणी यासर काझी (रा. नाना पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. समर्थ पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस उपनिरीक्षक शेट्टीबा शिंदे, पोलीस शिपाई पेरणे व मोरे हे बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर हद्दीत पायी पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान त्यांना एक व्यक्ती घाईगडबडीत उच्च प्रजातीचा बकरा घेऊन नरपतगिरी चौकातून निघाला होता. पोलिसांना काही गडबड असल्याचा संशय आल्यामुळे त्यांनी बकरा घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला थांबवले. त्याच्याकडे बकऱ्याबाबत विचारणा केली. तेव्हा त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली होती.

**लोकमत – दि. १३ ऑगस्ट, २०१९**

## पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम : विनापरवाना सिक्युरिटी एजन्सी चालविणारे

# चालक व मालकांवर कारवाई करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : जे विनापरवाना सिक्युरिटी एजन्सी चालवितात अशा चालक व मालकांवर कायदेशीर कारवाई करण्याबरोबरच सिक्युरिटी एजन्सीच्या परवान्याकरिता पैशाची मागणी होत असल्यास माहिती द्यावी, त्यावर कठोर कारवाई केली जाईल. १५ ऑगस्टनंतर सुरक्षारक्षकाला योग्य कागदपत्रांची पूर्तता केल्यास ५ दिवसांत चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मिळेल, अशी माहिती पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी दिली.

पुणे पोलीस व खासगी सुरक्षा रक्षक संस्था यांच्या वतीने पोलीस प्रायव्हेट सिक्युरिटी पार्टनरशिप प्रोग्रॅम पी-४ चा कार्यक्रम पुणे पोलीस आयुक्तालयामध्ये साजरा केला.

या वेळी पोलीस सह आयुक्त रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, पोलीस उपआयुक्त गुन्हे बच्चन सिंग, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) डॉ. संजय शिंदे, तसेच भारत शिल्ड फोर्सचे संस्थापक सचिन मोरे व महाराष्ट्र राज्यातील सुरक्षारक्षक सेवा पुरवठादार संस्थेचे मालक व चालक कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी सूत्रसंचालन केले.

- डॉ. व्यंकटेशम म्हणाले की, भविष्यकाळात पोलीस प्रायव्हेट सिक्युरिटी पार्टनरशिप प्रोग्रॅम पी-४ या उपक्रमाच्या माध्यमातून आणखी मोठ्या प्रमाणावर पुणे सुरक्षित करण्यावर भर दिला जाईल व शहरातील कायदा-सुव्यवस्था सांभाळण्याकरिता नागरिकांची जागरुकता आणि सहकार्याची अपेक्षा त्यावर त्यांनी भर दिला. तसेच, सर्व कामकाज गतिमान करण्यासाठी ऑनलाइन सुविधा असणार आहे. शहरात कोठेही काहीही झाल्यास, १०० नंबर प्रमाणेच ८७७५२८३१०० व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर माहिती देण्याचे आवाहन केले आहे

- अशोक मोराळे म्हणाले की, खासगी सुरक्षारक्षक हे गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, मॉल, हॉटेल अँड रेस्टॉरंट-पब, सर्व प्रकारची दुकाने, आयटी कंपनी, खासगी बंगले, बँक- एटीएम, सर्व प्रकारची ऑफिस, हॉस्पिटल, शाळा, कॉलेज, उद्याने, सार्वजनिक पे अँड पार्क पार्किंग, ज्वेलरी शॉप, बिग बाजार, डीमार्ट, सिनेमागृह, विविध बाजारपेठ इ. ठिकाणी काम करतात, त्यांनी पोलिसांचे खासदूत म्हणून काम केल्यास मोठ्या प्रमाणावर गुन्ह्यांवर आळा बसू शकतो व जे गुन्हे घडले त्यांच्या तपासाला चालना मिळू शकते. पोलीस स्टेशन व सुरक्षारक्षक यांचे १२० व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप तयार करुन संपूर्ण शहरात २१ हजारांहून खासगी रक्षक जोडले आहेत.

**लोकमत** – दि. १७ ऑगस्ट, २०१९

# कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर

## हॉटेलमालक : ३० लाखांचा मुद्देमाल जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कर्वेनगर येथे सुरु केलेल्या हॉटेल व्यवसायात आलेल्या तोट्यामुळे कर्जबाजारी झालेल्या हॉटेलमालकाने सोनसाखळी चोरण्यास सुरुवात केली. गेल्या दोन ते तीन महिन्यांत त्याने चार सोनसाखळ्यांची चोरी केली असून त्याला अलंकार पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून आतापर्यंत ३० लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

संजय श्रीधर हुले (वय ५३, रा. सिंहगड) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संजय याचे कर्वे रस्त्यावर हॉटेल आहे. हे हॉटेल सुरु करण्यासाठी त्याने अनेकांकडून ३० ते ४० लाखांचे कर्ज घेतले होते. पुढे व्यवसाय न चालल्याने त्याच्यावरील कर्जाचा बोजा वाढत गेला. अशा वेळी देणेदारांचे कर्ज फेडण्याकरिता त्याच्याकडे पैसे नसल्याने त्याने सोनसाखळ्या चोरण्यास सुरुवात केली. संजय याच्याविरोधात अलंकार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

साखळीचोरांवर नियंत्रण आणण्याकरिता सध्या पोलिसांकडून गस्त घालण्यात येत आहे. तपास पथकाचे कर्मचारी प्रफुल्ल चव्हाण व राजेंद्र लांडगे यांना हिमाली सोसायटीच्या रस्त्यावर पावसाळी जॅकेट घातलेली एक संशयास्पद व्यक्ती दिसून आली. त्यानंतर त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने आपले नाव संजय हुले असून चार सोनसाखळ्या चोरल्याचे सांगितले. या गुन्ह्यातून ३० लाख ७२ हजार रुपयांचा एकूण ९६ ग्रॅम सोन्याचा मुद्देमाल हस्तगत केला.

नवीन हॉटेल सुरू केल्यानंतर त्यात झालेल्या खर्चामुळे संजय कर्जबाजारी झाला होता. त्याचा हॉटेल व्यवसायदेखील तोट्यात होता. साधारण ३० ते ४० लाखांचे कर्ज असल्याने ती रक्कम परत करण्याकरिता त्याने गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून सोनसाखळी चोरण्यास सुरुवात केल्याची माहिती अलंकार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सूरज गोरे यांनी दिली.

ही कामगिरी गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक बाबुलाल तांदळे, प्रफुल्ल चव्हाण, राजेंद्र लांडगे, किरण राऊत, संदीप घनवटे यांनी पार पाडली.

**लोकमत** – दि. १७ ऑगस्ट, २०१९

# चार किलो गांजासह आरोपीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** येरवडा परिसरात एका व्यक्तीला बेकायदेशीरपणे गांजा बाळगणे व त्याची विक्री याप्रकरणी गुन्हे शाखेच्या युनिट १ ने अटक केली. त्याच्याकडून ८० हजार रुपयांचा चार किलो गांजा जप्त करण्यात आला. आकाश अण्णा माने (वय २२, रा. कानगाव, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस नाईक सचिन जाधव यांना पेट्रोलिंग करीत असताना येरवडा येथील बजाज अलायन्स कंपनीच्या गेटसमोर एक व्यक्ती बॅगेत गांजा घेऊन थांबल्याची खबर मिळाली. त्याप्रमाणे सापळा रचून आकाशला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या जवळ असलेल्या बॅगेची झडती घेतल्यानंतर त्यात ४ किलो ६४ ग्रॅम वजनाचा ८० हजार रुपये किमतीचा गांजा मिळाला. तसेच, ७० हजार रुपये किमतीची मोटारसायकल ताब्यात घेतली. अशा प्रकारे एकूण १ लाख ५० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत शिंदे, पोलीस उपनिरीक्षक दिनेश पाटील, उत्तम बुदगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी तुषार माळवदकर, सुभाष पिंगळे, प्रकाश लोखंडे, कैलास गिरी, उमेश काटे, अनिल घाडगे, योगेश जगताप यांनी पार पाडली. आरोपीला पुढील तपासाकरिता येरवडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

लोकमत – दि. २२ ऑगस्ट, २०१९

# वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक

## सिंहगड रस्ता पोलिसांची कामगिरी; बंटी पवार पोलीस ठाण्यामध्ये चौकशीसाठी आल्याने वाचला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नऱ्हे :** सिंहगड रस्त्यावरील तुकाईनगर व समर्थनगर परिसरात मंगळवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास एका टोळक्याने हातात नंग्या तलवारी व कोयते घेऊन वीस ते पंचवीस वाहनांची तोडफोड करून दहशत माजविली होती.

या तोडफोड करणाऱ्या व दहशत पसविणाऱ्या तेरा जणांना हडपसरमधून अवघ्या पाच तासांत सिंहगड रस्ता पोलिसांनी अटक करून त्यांना आज बुधवारी न्यायालयात हजर करण्यात आले. सुंदर रामचंद्र शर्मा, विक्रम प्रमोद पवार, लक्ष्मीकांत रमेश देसाई (तिघेही वय १९), साहिल ऊर्फ परवेज हैदरअली इनामदार (वय १८), सुमित राजकुमार सुरवसे (वय २०), प्रसाद सोपान बांदल (वय २३), अनिकेत राजू वायदंडे (वय १९), प्रफुल्ल भारत कांबळे (वय १९), अक्षय युवराज ठाकरे (वय २४), ऋतिक सुदाम इंगोले (वय १९), सनी ऊर्फ गिरीश महेंद्र हिवाळे (वय २०, सर्व रा. काळेपडळ, हडपसर, पुणे) ह्या अकरा आरोपींना अटक केली असून दोन आरोपी अल्पवयीन आहेत.

सिंहगड रस्ता पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार : मंगळवारी रात्री एका टोळक्याने टेम्पो, कार, ट्रक, रिक्षा, मोटारसायकल आदी वीस ते पंचवीस वाहनांची तोडफोड करीत येथील सुधाकर विठ्ठल भजनावळे यांच्या घरात घुसून टीव्ही, फ्रिज, पंखे इत्यादी साहित्याची मोडतोड केली. तसेच, तुकाईनगर येथील रब्बानी सय्यद यांच्या किराणा दुकानात घुसून काउंटर व आतील सामानाची मोडतोड केली. तुकाईनगरमधील गल्लीमधील पार्किंगमध्ये पार्क केलेल्या बऱ्याच मोटारसायकलींचेही नुकसान केले आहे.

परिसरात या टोळक्याने रस्त्यावर उभी असलेली रिक्षा, टेम्पो, दुचाकी, स्कॉर्पिओ, कार, मारुती व्हॅन, ट्रक, टेम्पो आदी वीस ते पंचवीस वाहनांच्या काचा फोडून कोयत्याने व तलवारीने मोडतोड करून परिसरात दहशत माजवून मोठे नुकसान केले. या टोळक्यांच्या हल्ल्यात समीर अलिफ शेख (वय १८), सुधाकर विठ्ठल भजनावळे (वय ४८) व बाळकृष्ण तुकाराम राऊत (वय ३४) जखमी झाले आहेत.

### बंटी पवारचा गेम वाजविण्यासाठी हडपसरमधून आले होते टोळके

मोक्काअंतर्गत कारवाई केलेला सराईत गुन्हेगार बंटी पवार सुटल्यानंतर १९ ऑगस्ट रोजी बंटी पवार याच्या साथीदारांनी त्याच्या सांगण्यावरुन चेतन ढेबे याच्यावर कोयत्याने वार करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला होता, अशी तक्रार चेतन पांडुरंग ढेबे व राहुल महादेव वायबसे (रा. तुकाईनगर, वडगाव बुद्रुक ,पुणे) यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात दिली होती. मात्र झालेला हल्ल्याचा राग मनात धरुन चेतन ढेबे याने हडपसरमध्ये राहणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणांशी संपर्क करुन बंटी पवारचा गेम वाजविण्यासाठी त्यानेच हडपसर येथून हे टोळके आणले होते. मात्र नेमका याच वेळी बंटी पवार चौकशीसाठी पोलीस ठाण्यात हजर असल्यामुळे या गेममधून तो वाचला. परंतु टोळक्यांना बंटी पवार न सापडल्यामुळे याचा राग येऊन तो राहत असलेल्या परिसरातील वाहनांची तोडफोड या टोळक्याने केली.

"बंटी व चेतन दोघेही सराईत गुन्हेगार आहेत. त्यांच्यामध्ये २००५ पासून वर्चस्ववादातून वाद आहेत. बंटी पवारवर १६ गुन्हे दाखल आहेत. यात दोन खुनाचे आणि सहा खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे आहेत. बंटी पवार येरवडा कारागृहातून २७ जूनला बाहेर आला होता. या गुन्ह्यात गुन्हे शाखा आणि सिंहगड पोलिसांनी आरोपींची धरपकड सुरु केली आहे. शहरात टोळ्यांतील वर्चस्ववादातून अशा घटना घडत आहेत. यामुळे वर्चस्ववाद असलेल्या टोळ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

**- बच्चनसिंग**
(पोलीस उपायुक्त, गुन्हे)

लोकमत – दि. २३ ऑगस्ट, २०१९

# बसमधील चोरीचे १४ गुन्हे उघडकीस

## पैसे चोरणाऱ्या टोळीस अटक : गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** बसमधून महिलांच्या गळ्यातील दागिने तसेच बॅगेतून पैसे पळविणाऱ्या चोरांना गुन्हे शाखेच्या युनिट २ ने अटक केली आहे. त्यातून बसमधील चोरीचे १४ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्या गुन्ह्यातून एकूण ४ लाख ३६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गेल्या काही दिवसांपासून बसमधून दागिने व पैसे चोरीला जाण्याचे अनेक गुन्हे घडले होते. गुन्ह्यातील आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून मोठ्या संख्येने मुद्देमाल पोलिसांना मिळविण्यात यश आले आहे.

◆ बंडगार्डन, स्वारगेट, शिवाजीनगर, वानवडी या पोलीस ठाण्याला दाखल असलेल्या एकूण १४ गुन्ह्यांची उकल गुन्हे शाखेने केली आहे. त्यातून ४ लाख ६ हजार ६00 रुपये किमतीचे १07 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व 30 हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ४,३६,६00 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक जयवंत जाधव, पोलीस उपनिरीक्षक नितीन शिंदे, पोलीस कर्मचारी संजय दळवी, यशवंत आंबे, अनिल ऊसुलकर, शेखर कोळी, दिनेश गडांकुश, अस्लम पठाण, विनायक जाधव, अतुल गायकवाड, चेतन गोरे, विशाल भिलारे, उत्तम तारु, विवेक जाधव, स्वप्निल कांबळे, कादीर शेख, अजित फरांदे, मितेश चोरमले व गोपाळ मदने यांनी ही कारवाई केली.

युनिट २ ने केलेल्या तपासाविषयी पत्रकार परिषदेत आयोजित केली होती. यात गुन्हे [illegible] गजानन पवार यांनी माहिती दिली. कृष्णा ऊर्फ अण्णा गव्हाणे (वय २४, रा. वाघोली) आकाश ऊर्फ आक्या [illegible] मंगेश ऊर्फ मंग्या उकरंडे (वय १८, रा केसनंद गांव) सूरज सोनवणे (वय २१ रा. खराडी) हुकुमसिंग भाटी (वय ४७ रा. खराडी) या आरोपींना अटक केल आहे. सूरज सोनावणे टोळीचा प्रमुख आहे. याच्यावर अशाच प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. आरोपींकडे तपास केला असता पुणे स्टेशन, स्वारगेट शिवाजीनगर अशा गर्दी असलेल्या बस स्टॉपकडे येणाऱ्या बस मध्ये चढू गर्दीचा फायदा घेऊन ज्येष्ठ किंव एकट्या महिला अथवा व्यक्तीला हेरु त्यांच्या गळ्यातील दागिने, हातातील पाटल्या व पर्समधिल पैसे व दागिन चोरी केल्याची कबुली आरोपींन दिली.

**महाराष्ट्र टाइम्स – दि. १२ ऑगस्ट, २०१९**

## इंदूरमध्ये ५३ लाख रुपये काढणाऱ्या दोघांना अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कॉसमॉस बँकेच्या सर्व्हरवर सायबर हल्ला करून ९४ कोटी लूट केल्याच्या आरोपावरून सायबर सेलच्या पोलिसांनी आणखी दोन आरोपींना भिवंडी परिसरातून अटक केली आहे. या दोघांनी एटीएममधून ५३ लाख रुपये काढल्याचे समोर आल आहे. या दोन आरोपींच्या अटकेमुळे या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या १५ झाली आहे. या दोघांना कोर्टाने २८ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

सलमान महंमद नईम बेग (वय ३१, रा. न्यू नशेमन, तन्वरनगर, कौसा, मुंब्रा ठाणे) व शेहबाज फारुख शेख (वय २९, रा. अंबर व्हिला, अमृतनगर, मुंब्रा, ठाणे) अशी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहे. गणेशखिंड रस्त्यावरील कॉसमॉस



**क्राइम डायरी**

बँकेच्या मुख्यालयात एटीएम स्विच (सर्व्हर) सायबर चोरांनी मालवेअरचा हल्ला करून व्हिसा व रुपे डेबिट कार्डधारकांची माहिती चोरली होती. ११ ते १३ ऑगस्ट २०१८ या कालावधीमध्ये १४ हजार ८४९ व्यवहाराद्वारे ८० कोटी ५० लाख आणि स्विफ्ट व्यवहाराद्वारे हाँगकाँगमधील हेनसेंग बँकमध्ये १३ कोटी ९२ लाख रुपये असे एकूण ९४ कोटी ४२ लाख रुपयांची फसवणूक केली होती. या प्रकरणी चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यामध्ये माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल कण्यात आला होता.

सायबर शाखेचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक जयराम पायगुडे यांचे पथक आरोपींचा माग काढत होते. या पथकाने एनपीसीआय, व्हिजा व बँककडून माहिती प्राप्त करून त्याचे तांत्रिक विश्लेषण केले. त्यावरून मुंबई, कोल्हापूर, अजमेर व इंदूर या शहरांमधून पैसे काढल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार, कोल्हापूर, अजमेर व इंदूर येथील टोळ्यांमधील १३ जणांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणाचा तांत्रिक तपास सुरू असताना कॉसमॉस बँकवरील सायबर हल्ल्याच्या वेळी इंदूरमधील एटीएममधून पैसे काढणाऱ्या दोघांची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार, पोलिसांची दोन पथके तयार करून ती मुंबई व ठाणे येथे पाठविण्यात आली. त्यामध्ये ठाण्यातील भिवंडी येथे असलेल्या बेग व शेख या दोघांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींनी इंदूरमधील एटीएममधून ५३ लाख ७२ हजार रुपयांची रक्कम काढल्याचे समोर आले आहे.

**महाराष्ट्र टाइम्स – दि. २४ ऑगस्ट, २०१९**

# फरारी आरोपीला लोहगावमधून अटक

## अल्पवयीन मुलीवर बलात्कार

म. टा. प्रतिनिधी, येरवडा

भावाला मारून टाकण्याची धमकी देऊन आठवीत शिकणाऱ्या शाळकरी मुलीवर जबरदस्तीने बलात्कार करून फरारी झालेल्या आरोपीला विश्रांतवाडी पोलिसांनी वाघोली येथून अटक करण्यात आली.

धनंजय मारमिल्ले (वय २८, रा. धानोरी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या वडिलांनी फिर्याद दिली आहे. आरोपीवर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलगी बुधवारी दुपारी शाळेत जात असताना आरोपीने तिला अडवले. 'तू माझ्याशी का बोलत नाही, मी सांगेल तसे करावे लागेल; नाही तर तुझ्या भावाला जीवे मारीन,' अशी धमकी दिली. त्यानंतर जबरदस्तीने घरी नेऊन तिच्यावर बलात्कार केला. काही वेळाने



मुलीची आई तिचा शोध घेत असताना ती आरोपीच्या घरात भेदरलेल्या अवस्थेत सापडली. या प्रकारानंतर मुलीच्या वडिलांनी पोलिसांत फिर्याद दिली. यादरम्यान आरोपी फरारी झाला होता. गेल्या दोन दिवसांपासून पोलिस आरोपीचा शोध घेत होते. पण आरोपी वेळोवेळी ठिकाण बदलत असल्याने माग काढूनही तो सापडत नव्हता. अखेर मोबाइल लोकेशनच्या मदतीने शुक्रवारी सकाळी मारमिल्ले याला लोहगावमधील संतनगरमधून ताब्यात घेण्यात आले.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक (गुन्हे) रवींद्र कदम यांच्या नेतृत्वाखाली कर्मचारी प्रफुल्ल मोरे, किशोर दुशिंग, प्रवीण भालचीम आणि शेखर खराडे यांनी ही कामगिरी केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २२ ऑगस्ट, २०१९

# कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कमी किंमतीत बुलेट घेऊन देण्याच्या आमिषाने लष्करी जवानाची फसवणूक करून पसार झालेल्या सराईताला मुंढवा पोलिसांनी मुंबईतून अटक केली आहे. त्याने अशा प्रकारे अनेकांना गंडा घातल्याचे समोर आले आहे.

जयेश संजय आडुळकर (वय २६, रा. काळेवाडी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी संतोष बकाराम (वय ३५, रा. घोरपडी) यांनी मुंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली

**क्राइम डायरी**

## सहलीच्या बहाण्याने उकळले लाखो रुपये

देश-परदेशात सहलीसाठी जाण्याचे आमिष दाखवून नागरिकांची ११ लाख ३५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी हिंजवडी पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीला २३ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. निखिल मोहन परदेशी (वय २९, रा. येरवडा) असे आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी यापूर्वी एकाला अटक करण्यात आली आहे. एका ७० वर्षांच्या ज्येष्ठ व्यक्तीने फिर्याद दिली आहे. २०१५ ते ७ एप्रिल २०१९ या कालावधीत बावधन परिसरात ही घटना घडली. आरोपींनी फिर्यादीसह इतर नागरिकांना देश-परदेशामध्ये सहल आयोजित करून देण्याचे आमिष दाखवले. लोकांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून पैसे घेतले. मात्र, त्यांना सहलीसाठी न पाठवता, तसेच त्यांचे पैसे परत न करता ११ लाख ३५ हजारांची फसवणूक केली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी आरोपीला अटक करून कोर्टात हजर करण्यात आले होते. सहलीसाठी घेतलेले पैसे त्यांनी कशासाठी वापरले, त्यांचा आणखी कोणी साथीदार आहे का, याचा तपास करण्यासाठी त्याची पोलिस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकील ज्ञानेश्वर मोरे यांनी केली.



आहे. बकाराम हे सैन्यदलात आहेत. खराडीतील एम. एन. एस. रेड्डी हेही सैन्यदलात असल्याने त्यांची ओळख आहे. बकाराम हे रेड्डी यांच्याकडे येत होते. आडुळकर हा रेड्डी यांच्या येथे भाड्याने राहत होता. यामुळे बकाराम व आरोपी आडुळकर यांची ओळख झाली होती. या वेळी आरोपीने त्यांना कमी किंमतीत बुलेट घेऊन देण्याचे आमिष दाखविले. त्यांचा विश्वास संपादन केला. या वेळी तक्रारदार व त्यांच्या नातेवाइकांना बुलेट घेऊन देण्यासाठी म्हणून वेळोवेळी एकूण दोन लाख १४ हजार रुपये आरोपीने घेतले. मात्र, त्यांना बुलेट न देता त्यांची फसवणूक केली. या प्रकरणी मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास उपनिरीक्षक बी. एस. गुरव करत होते. त्यांनी आरोपी आडुळकर याच्या बँक खात्याची व इतर माहिती घेतली असता तो काळेवाडीतील असल्याचे समोर आले. त्याची माहिती घेतल्यानंतर त्याच्यावर यापूर्वी पिंपरी पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल होता. तसेच, तो एका खासगी वाहन विक्रीच्या दुकानात नोकरी करत असल्याची माहिती मिळाली. त्या ठिकाणी मिळणाऱ्या डिस्काउंटमधून चार चाकी व दुचाकी वाहने कमी किंमतीत देण्याच्या बहाण्याने त्याने अनेकांना फसविले असल्याचे समजले. त्याचा शोध घेतला जात होता. या वेळी तो मुंबईतून दिल्लीला पळून जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने त्याला छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक केली. तपासात त्याने अनेकांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

TIMES OF INDIA - 29 August, 2019

# Homeless youth arrested for girl's kidnap & murder at Pune station

**Pune:** A 19-year-old homeless youth was arrested on Wednesday afternoon for kidnapping and killing a two-and-a-half-year-old girl at the Pune railway station in wee hours of Tuesday following a dispute with her father and uncle a day before.

The arrested youth was identified as Prathmesh Gaikwad (19) and stayed on the footpath near the railway station. He has his roots in Jejuri, police said.

The girl's mother lodged a complaint with the police after she was killed. The police on Wednesday said the girl was not raped but was tortured by the suspect. Gaikwad had bite the girl all over, the police said.

A Bund Garden police team headed by senior inspector Sunil Tambe on Wednesday recreated the crime scene and conducted a search operation in and around the Pune station. The policemen also scanned the CCTV cameras near the Pune railway station and spotted the man carrying the girl.

The police said Gaikwad picked up a fight with the girl's father and uncle on the occasion of Dahi Handi. He kidnapped the girl to take revenge.

According to the police, the girl's mother stays on a footpath in front of the railway hospital. She was in deep slumber when Gaikwad kidnapped her daughter in wee hours of Tuesday.

He then took the girl to the station and killed her in the compartment of a stationary train. Train cleaners saw the girl and raised an alarm.

**Pune:** The Railway Protection Force (RPF) on Wednesday said it would step up patrolling in the city's railway station yard area.

The para-military force's decision follows the recovery of a two-and-a-half-year-old kidnapped girl in the coach of a train stations at the railway yard on Tuesday. The girl was taken to the Sassoon General Hospital, where she died. Police had said on Tuesday the girl was raped and dumped in the coach of the train. A senior RPF officer said, "The yard is open from all sides and anyone can walk in and out of the area. RPF patrolling is strict at the station. We will ensure similar measures in the yard area too," he said.

"Plans are afoot to build a 300m boundary wall along the yard, covering both the ends — one towards Solapur and another on way to Mumbai. Once the railway board approves the plan, we hope the wall will come up soon. Until then, we will step up patrolling in the whole area. Additional security measures will also be taken by the BVG Group managing the railway station," the officer said.

Pune railway division public relations officer Manoj Jhawar said, "We are extending all

**PuneMirror** - 23 August, 2019

# Police arrest MPSC student for stalking, molesting a 25-yr-old

**Accused and complainant only talked over phone; he had threatened her against befriending others**

| Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEET @gunwantimirror

A 27-year-old Maharashtra Public Service Commission (MPSC) student was booked for molestation, after a 25-year-old woman complained, saying that she would be constantly followed. The complainant, who is also an MPSC student, and the accused attended the same coaching class and even studied at the library. She claimed that he would call her constantly and even displayed aggressive behaviour — despite not having any conversations apart from their virtual contact through mobiles.



A case was registered in Vishrambaug police station two days ago. The cops arrested **Vinayak Wagh** on Thursday. He stays in Narayan Peth on rental basis. He came in touch with the complainant last year on a virtual platform. They continued talking to each other on mobile, however, did not meet each other. As months passed by, the complainant said that Wagh turned possessive about her and would often express displeasure when she attempted to make other friends. At one instance, he even threatened the girl, saying that she should not befriend boys.

As his behaviour turned "aggressive", she blocked his number. Angered by her actions and the fact that she was avoiding him, he tried to talk to the complainant by following her. She then lodged a police complaint.

Geeta Patil, police sub-inspector of Vishrambaug police station told *Mirror*, "The complainant and the accused had not met each other in person and talked on phone. When the accused observed that the complainant was talking to one of their common friends — and eventually got close — he threatened the complainant. He specifically told her that he did not like it when she talked to other boys."

Furthermore, Wagh would constantly call her and even threatened the common friend, asking him to stay away from the complainant. Following these incidents, she began avoiding him.

"The complainant, initially, said that she did not know Wagh in person and talked about his aggressive nature. Later, we got to know that both of them were in touch with each other through mobiles. When she also said that she was being stalked, we confirmed that person was Wagh," Patil added.

Dada Chudappa, police inspector of Vishrambaug police station, told *Mirror* that the accused was booked under Indian Penal Code sections 354 (assault or criminal force to woman with intent to outrage her modesty), 504 (intentional insult with intent to provoke breach of the peace), and 506 (punishment for criminal intimidation).

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. २२ ऑगस्ट, २०१९

# वृद्ध दाम्पत्याचे दागिने चोरणाऱ्याला सक्तमजुरी

म. टा. प्रतिनिधी, पुणे



वृद्ध दाम्पत्याची ओळख करून घेऊन त्यांच्या घरात घुसून जबरदस्तीने दागिने हिसकावून चोरून नेलेल्या तरुणाला कोर्टाने सात वर्षे सक्तमजुरी आणि एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. जिल्हा न्यायाधीश ए. एन. शिरसीकर यांच्या कोर्टाने हा निकाल दिला.


अक्षय अशोक कदम (वय २२, रा. संभाजीनगर, धनकवडी) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी मृणालिनी केशव गोखले (वय ७०, रा. पर्वती) यांनी फिर्याद दाखल केली होती. या खटल्याचे कामकाज सरकारी वकील संजय पवार यांनी पाहिले. त्यांनी खटल्यात नऊ साक्षीदार तपासले.

३० जून २०१६ रोजी फिर्यादींच्या घरात हा प्रकार घडला. घटनेच्या दोन दिवस अगोदर आरोपीने गोखले आणि त्यांच्या पतीबरोबर ओळख करून घेतली होती. त्यानंतर तो गोखलेंच्या घरी आला. त्यांच्या घरात आल्यानंतर मृणालिनी यांच्या डोक्यात कुकर मारून त्यांना गंभीर जखमी केले. त्यांच्या घरातील एक लाख २० हजार रुपयांच्या सोन्याच्या बांगड्या चोरून नेल्या. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कायदा कलम ३९४, ३९७, ४५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीने सोन्याच्या बांगड्या ज्या सोनाराला विकल्या होत्या, त्या सोनाराची साक्ष या खटल्यात महत्त्वाची ठरली. आरोपीने बांगड्या सोनाराला विकताना त्या आपल्या आजीच्या असून ती आजारी असल्याचे कारण सांगून विकल्या होत्या. संबंधित सोनाराने त्याला सोन्याच्या बांगड्यांची रक्कम धनादेश स्वरूपात दिली होती. आरोपी तरुणाला कोर्टाने सात वर्षे सक्तमजुरी आणि एक हजार रुपये दंड आणि घरात जबरदस्तीने घुसल्याप्रकरणी दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

**प्रभात** – दि.१९ ऑगस्ट, २०१९

# गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक

**पुणे, दि. १८** - ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखेने धडक कारवाई करून पुणे-नगर रस्त्यावर गावठी पिस्तुल बाळगणाऱ्या ३ जणांना अटक केली. त्यांच्याकडून १ कार, २ गावठी पिस्तुले आणि ३ जिवंत काडतुसे असा ५ लाख ३ हजारांचा ऐवज जप्त केला.



अजहर सबदर खान (रा. भाजी बाजार, शिरूर), प्रदीप श्रीकिशन तिवारी (रा. साइनगर, भिसे, हौसिंग सोसायटी, शिरूर), सागर रामचंद्र धनापुरे (रा. सूर्यनगर, तपोवन रोड, अहमदनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अजहर हा सराइत गुन्हेगार असून त्याच्यावर शिरूर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

**प्रभात** – दि.२८ ऑगस्ट, २०१९

# धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद

**पुणे, दि. २७** - दहिहंडी उत्सवात धक्का लागला म्हणून भांडणे सोडविणाऱ्यावर कोयत्याने व तलवारीने वार करण्यात आले. यातील तिघांना गुन्हे शाखेच्या युनिट चारने जेरबंद केले.

विनायक सुनिल गायकवाड (२५, रा. पाषाण), किशोर लक्ष्मण रामावत (२४, रा. पाषाण), संकेत राजू जाधव (२०, रा. औंध) अशी अटक आरोपींची नावे आहेत. फिर्यादी व त्याचा मित्र पाषाण येथे दहिहंडी पहाण्यासाठी गेले होते. यावेळी फिर्यादीच्या मित्राचा संकेत जाधवला धक्का लागला. यावरून आरोपी व फिर्यादीच्या मित्राची बाचाबाची झाली. यामध्ये फिर्यादीने दखल घेऊन वाद मिटवला होता. मात्र, फिर्यादी व मित्र दोघे घरी जात असताना आरोपी विनायक, किशोर, संकेत हे तीथे आले. त्यांनी फिर्यादीच्या डोक्यात कोयता व पाठीत तलवारीने वार केले. फिर्यादीला स्थानिक नागरिकांनी रुग्णालयात दाखल केले. या गुन्ह्याचा समांतर तपास युनिट चारचे पथक करत असताना पोलीस कर्मचारी विशाल शिर्के व शंकर संपते यांना आरोपी हे पाषाण येथील हॉटेल अभिमान येथे नातेवाईकांची वाट पहात थांबले असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार घटनास्थळी जावून त्यांना ताब्यात घेतले.

प्रभात – दि.३१ ऑगस्ट, २०१९

## निवडक



पुणे : महिलेची छेड काढणाऱ्या व्यक्तीला दामिनी पथकातील महिला कर्मचाऱ्यांनी धडा शिकवला.

### महिलेची छेड काढणाऱ्यास दामिनी पथकाचा धडा

**पुणे, दि. ३० -** दामिनी पथकाला समाजकल्याण विभाग येथे एक व्यक्ती महिलेची छेड काढताना दिसली. त्यांनी त्याला जाब विचारताच त्याने दामिनी पथकातील महिला कर्मचाऱ्यांशीही असभ्य वर्तन करण्यात सुरवात केली. याची गंभीर दखल घेत दामिनी पथकाने इतर सहकाऱ्यांना बोलावून त्याला थेट बंडगार्डन पोलीस ठाण्यात नेले. त्याच्यावर तेथे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई बंडगार्डन व कोरेगाव पार्क दामिनी पथकातील महिला कर्मचारी खान, सोनवणे, अत्राम यांच्या पथकाने केली.

पुढारी – दि. ११ ऑगस्ट, २०१९

## कुर्बानीसाठी पाळलेला बकरा चोरणारा पोलिसांच्या जाळ्यात

**पुणे : प्रतिनिधी**

बकरी ईदच्या निमित्ताने कुर्बानीसाठी पाळलेला बकरा लंपास करणाऱ्या ताफिम बेग (रा. मंगळवार पेठ) याला समर्थ पोलिसांच्या गस्ती पथकाने जेरबंद केले. हा चोरीचा बकरा सानियन जातीचा असून, त्याची बाजारात किंमत २५ हजार रुपये एवढी होती. चोरीच्या बकऱ्याची तो बाजारात विक्री करणार होता; मात्र त्याअगोदरच पोलिसांच्या गळाला लागला आणि त्याचा डाव फसला.

समर्थ ठाण्याचे पोलिस कर्मचारी सहा. पोलिस उपनिरीक्षक शेट्टीबा शिंदे, पोलिस शिपाई पेरणे व मोरे हे बकरी ईदच्या अनुषंगाने हद्दीत पायी पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान, त्यांना बेग हा घाईगडबडीत उच्च प्रजातीचा बकरा घेऊन नरपतगिरी चौकातून निघाल्याचे दिसले. पोलिसांना काहीतरी गडबड असल्याचा संशय आल्यामुळे त्यांनी बकरा घेऊन जाणाऱ्या बेगला थांबवले. त्याच्याकडे बकऱ्याच्या बाबत विचारणा केल्यावर तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. सखोल चौकशीत त्याने नाना पेठेतून बकरा चोरी केल्याचे सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी बकरा मालकाचा शोध घेतला. यासर काझी (रा. नाना पेठ) यांनी त्यांचा बकरा चोरीला गेल्याचे सांगितले. काझी यांच्या फिर्यादीनुसार आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. न्यायालयाने आरोपी बेगची येरवडा कारागृहात रवानगी केली.



पोलिसांनी पकडलेला हाच तो चोरीचा बकरा.

**पुढारी** – दि. २१ ऑगस्ट, २०१९



# दामिनींनी ठोकल्या गुंडांना बेड्या

## हडपसर, वानवडी पथकाची संयुक्त कारवाई

**पुणे: प्रतिनिधी**

हडपसर आणि वानवडी दामिनी पथकाने संयुक्त कारवाई करत अमोल बाळासाहेब बोरकर (२८, रा. काळेपडळ), विराज जगदीश यादव (२४, रा. आनंद नगर, हांडेवाडी) या दोन सराईतांना जेरबंद केले. यामधील एक जण तडीपार असून, दुसरा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. यावेळी त्यांच्या ताब्यातून एक छऱ्याची बंदूक, कोयता अशी शस्त्रे जप्त करण्यात आली आहे.

सय्यद नगर रेल्वे गेटजवळ मोर मॉलच्या शेजारील एका चहाच्या टपरीजवळ दोन सराईत थांबले असल्याची माहिती हद्दीमध्ये गस्तीवर असलेल्या दामिनी पथकाला मिळाली. त्यानुसार हडपसर व वानवडी दामिनी पथकाने महम्मदवाडी व तुकाई मार्शल मदतीसाठी बोलावून दोघांना अटक केली. पुढील कारवाईसाठी दोघांनाही हडपसर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कामगिरी रुपाली टेंगळे, सोनाली कारंडे, धनश्री गवस, रुपाली शिंदे यांच्या पथकाने केली.

**सकाळ** – दि. ३० ऑगस्ट, २०१९

# तलवार हल्ल्यातील आरोपींना अटक

**पुणे, ता. २९ :** दहीहंडी उत्सवात धक्का लागल्यावरून झालेली भांडणे सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणावर कोयत्याने व तलवारीने वार झाले होते. गुन्हे शाखेच्या युनिट चारच्या पथकाने आरोपींना तत्काळ अटक केली.

विनायक सुनील गायकवाड (वय २५, रा. पाषाण), किशोर लक्ष्मण रामावत (वय २४, रा. पाषाण), संकेत राजू जाधव (वय २०, रा. औंध) अशी संशयित आरोपींची नावे आहेत. श्रावण जाधव यांनी चतुःशृंगी ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी जाधव हे त्यांच्यासह मित्रासह पाषाण येथे दहीहंडी पाहण्यासाठी गेले होते. तेव्हा त्यांच्या मित्राचा संकेत जाधव यास धक्का लागल्याने त्यांच्यात बाचाबाची झाली. तेव्हा फिर्यादीने मध्यस्थी करून वाद मिटविला. आरोपींनी फिर्यादीस तुला बघून घेतो, अशी धमकी दिली. दहीहंडीनंतर फिर्यादी घरी जाताना विनायक, किशोर, संकेत या तिघांनी त्यास हॉटेल सर्जा येथे अडविले. त्यानंतर तिघांनी त्यांच्याकडील तलवार व कोयत्याने वार करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला.दरम्यान, आरोपी हॉटेल अभिमान श्री जवळ त्यांच्या नातेवाइकांची वाट पाहत थांबल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पोलिस कर्मचारी शंकर संपते व विशाल शिर्के यांना मिळाली. पथकाने सापळा रचून त्यांना अटक केली.

# ज्येष्ठाला १५ लाखांना गंडा घालणाऱ्यास अटक

## पितळी पट्ट्या सोन्याच्या असल्याचे भासवून फसवणूक

पुणे, दि. ८ (प्रतिनिधी) – घर बांधण्यासाठी मित्रांकडून १५ लाख रुपये उसने घेऊन बदल्यात त्यांना पितळी पट्ट्या सोन्याच्या असल्याचे भासवून ज्येष्ठाला गंडा घालणाऱ्याला भामट्याला कोथरूड पोलिसांनी अटक केली. ही घटना आठ दिवसांपूर्वी कोथरूडमध्ये घडली होती.

भीमा कोंडिबा जाधव (वय ५५, रा. शेळगाव, धाराशिव) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी यशवंत वसंत परांजपे (वय ६९, रा. कोथरूड) यांनी कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. भीमाने यशवंत यांचा विश्वास संपादित करून त्यांच्याकडून घरबांधणीसाठी १५ लाख रुपयांची मागणी केली. मात्र, एवढ्या मोठ्या रकमेसाठी तारण काय देणार? अशी विचारणा त्यांनी भीमाला केली. त्यावेळी भीमाने यशवंत यांचा विश्वास बसण्यासाठी १० ग्रॅम सोन्याची पट्टी दिली.

यशवंतने पट्टी खरी आहे की नाही याची तपासणी सोनाराकडे केली. त्यावेळी ती खरी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर भीमाने सोन्यासारख्या दिसणाऱ्या ६० पट्ट्या यशवंतला दिल्या. त्यामुळे यशवंतने भीमाला १५ लाख रुपये उसने दिले. मात्र, काही दिवसांनी भीमाचा फोन बंद लागला. त्यामुळे संशय बळावल्याने यशवंतने पट्ट्या सोनाराला दाखविल्या असता, त्या खोट्या निघाल्या. त्यामुळे फसवणूक झाल्याचे यशवंत यांच्या लक्षात आल्याने त्यांनी तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी भीमाला त्याच्या गावातून ताब्यात घेतले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रतिभा जोशी आणि सहायक पोलीस निरीक्षक एस. व्ही. बुवा यांच्या मार्गदर्शनाखाली विजय कांबळे, विनायक पाडळे, संदीप शेळके, नितीन जगदाळे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

The Indian EXPRESS - 24 August, 2019

# Five arrested for 'stealing cash bag' containing over Rs 29 lakh from employee of courier firm

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, AUGUST 23

FIVE MEN were arrested recently for allegedly stealing a bag containing more than Rs 29 lakh in cash from an employee of a courier firm on August 10. The courier, Vitthal Shrinivasrao Karajgikar (61), was taking the money for his employer to Pune in a private bus and had stepped out to relieve himself at Yerwada, when the accused grabbed his bag and fled from the spot.

The accused have been identified as Gajanan alias Pintu Pandurang Suvarnakar (30), Sandip Tanaji Biradar (22), Mangesh Ramesh Biradar (28), Sumit Balaji Patil (19) and Rahul Devidas Suryawanshi (20). Of these, Suvarnakar also worked for the employer of Karajgikar, the courier, in Nanded, but had left the job a few months ago.

Karajgikar had been tasked by his employer with giving Rs 29,24,650 to a businessman in Pune. According to police, Suvarnakar conspired with five others and decided to steal the money from Karajgikar. Suvarnakar and his accomplices placed Karajgikar under watch when he boarded the private bus with the bag carrying the money, said police.

When the bus halted in Yerwada at 6.30 am on August 10, Karajgikar stepped out of the bus to relieve himself, and Suryanwashi stole the bag and fled from the spot with the help of his aides, who were hiding nearby, police said.

Karajgikar lodged the complaint in this case at Yerwada police station. The police booked the accused under sections 395 (dacoity) and 120 (concealing design to commit offence punishable with imprisonment) of the Indian Pebnal Code.

The police initiated investigation and identified the persons involved in the robbery. Acting on a tip-off, the police arrested Sumit Patil and Rahul Suryawanshi at Sangamwadi in Pune, while they were allegedly trying to escape to Latur on a private bus on Thursday. Police also arrested Suvarnakar, the key accused, along with Sandip and Mangesh Biradar.

According to police, the accused distributed the cash among themselves. "We have arrested five persons involved in the crime. Search is on for the sixth accused. So far, we have recovered Rs 10.5 lakh cash from the accused. The accused have been remanded to our custody for four days," said Sub-inspector Mangesh Bhange.

TIMES OF INDIA - 07 August, 2019

# Youth in the net on phone theft charge

Times News Network

Pune: The Bharati Vidyapeeth police arrested a 19-year-old youth on Monday for stealing smartphones from college students for the past three months.

The police have recovered six smart phones worth Rs83,000 from him. Prima facie probe revealed that the youth had stolen over 15 smart phones from a hostel in Ambegaon and neighbouring areas. A team led by senior inspector Vishnu Pawar arrested him based on a tip-off.

Sub-inspector Mahendra Patil said, the police had been receiving complaints from the students of the hostel about their smart phones being stolen from their rooms. While probing these thefts, the police got information that a minor who was on the records of the Bharati Vidyapeeth police was involved in these thefts and that he would visit a market near Bharati Vidyapeeth for selling some of the stolen smart phones and that is where he was caught red-handed, said Patil.

"He appeared several times on CCTV footage gathered from near the hostel," Patil added.

Patil said that the suspect was passionate about watching newly released movies and dearth of money drove him to steal the phones to get easy money. "He used to sell these phones at throwaway prices and go for movies," he added.

TIMES OF INDIA - 17 August, 2019

# Man arrested for attacking cops outside jail

Times News Network

Pune: A 32-year-old man from Dattawadi attacked a policeman from Ahmednagar for refusing him the permission to offer food to his brother, Wasim Patel, languishing in the jail for chain-snatching cases.

The incident happened outside the central prison at 3.15pm on Wednesday, when three policemen brought Patel from Shrirampur sub-jail to Yerawada amid tight security because of his involvement in large number of chain-snatching cases in Pune, Ahmednagar and other places.

The policemen were escorting Patel to the prison gate when his brother, Asif, rushed to him with a tiffin box and a packet of bidi. He appealed to policemen to allow him give the food to his brother and permit him to smoke on humanitarian grounds, but they turned down his request.

Constable Harish Pansanval (30) from the Ahmednagar police said on Friday, "Asif had picked up arguments with the policemen after they refused to remove his brother's handcuff. He was told that such facility cannot be offered to a person in custody."

Pansanval said, "The Shrirampur police had taken action against Asif for bursting firecrackers outside the sub-jail here on the occasion of his brother's birthday. He developed a grudge that he was not allowed to meet his brother because of the said case. He threatened to bang his head against the prison wall."

The police said Asif was taken into custody and handed over to the Yerawada police. A case under sections 353 (obstructing public servant from discharging duty) and 332 (grievous hurt) of the Indian Penal Code has been registered against him.

TIMES OF INDIA - 17 August, 2019

# Duo arrested for attacking and robbing two men

Times News Network

Pune: Three persons on a motorcycle threatened two men with a knife and robbed them of their cash and smartphones, collectively worth Rs10,200, after attacking them with stones at a Pune Mahanagar Parivahan Mahamandal Limited bus stop near the central building around 3.30am on Thursday.

Acting on a tip-off by one of the injured men, a police night patrol team nabbed two suspects, Nasruddin Pathan (21) and Rahul Ubale (19), both residents of Queens Garden Road, near Sadhu Vaswani chowk. The third man managed to escape.

The Bund Garden police have registered a case of armed robbery. Car driver, Manoj Mahajan (39) from Kondhwa, reached the Pune railway station from Mumbai, and was waiting for a bus when three men, riding triple seat, stopped on finding him alone.

Assistant inspector Sandip Jamdade of the Bund Garden police said, "The suspects abused Mahajan and asked him to hand over cash and valuables to them. One of the suspects threatened him with a knife, while the others frisked and robbed him of Rs2,000 and the phone," he said.

"They hit him with stones on his chest and behind his right ear after he resisted, and sped away. The injured victim received two stitches behind the ear," he added.

Jamdade said, "A panicked Mahajan then walked up to Sadhu Vaswani chowk when he saw the suspects attacking and robbing the phone of Anmol Naresh from Kasewadi. Mahajan stopped a police night patrol, comprising policemen Vivek Jagtap and Akbar Khure, and told them about the robbery. The policemen then overpowered two of the three men."

"We are questioning the suspects to find out their involvement in other robbery cases. A police team has started a search for the third suspect," he said.

# अभिप्राय...

मा. वरिष्ठ पो. निरीक्षक सो.
कोंढवा पोलिस स्टेशन, पुणे.
यांना सविनय सादर

रिपोर्ट - श्री. एम. पाडवी पोलिस उपनिरीक्षक, कोंढवा पोस्टे यांजकडून.

विषय - दर्पण पुस्तकाबाबत.

दर्पण हा उपक्रम सुरु झाल्यापासून पोलिसांनी केलेल्या चांगल्या कामगिरी बद्दल लोकांना माहिती मिळते. या उपक्रमामुळे पोलिस व जनता यांच्यातील संबंध अधिक सुधारण्यास मदत होत आहे. जनतेला व सामान्य लोकांना पोलिसांवरचा विश्वास अधिक बळकट होत आहे. मा. पोलिस आयुक्त सो. पुणे शहर यांनी सुरु केलेला दर्पण हा उपक्रम प्रशंसनीय असून तो पोलिसांसाठी व जनतेसाठी उपयुक्त असून मोलाचे मार्गदर्शक असा ठरला आहे.

मा. सादर सही
दि. 18/05/19.
(सही)
पोलिस उपनिरीक्षक
कोंढवा पो. स्टे. पुणे शहर

---

**सहकारनगर पोलीस ठाणे**

**दर्पण पुस्तिका अभिप्राय**

१) पोलीस कर्मचारी याचे पुर्ण नाव :- मिनाक्षी जितेंद्र महाडिक

२) पदनाम :- महिला पोलीस नाईक

३) बक्कल नंबर :- ५९९१

४) नेमणुकीचे ठिकाण :- सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

५) दर्पण पुस्तिकेबाबत आपला प्रतिक्रियात्मक अभिप्राय / मत :-

मानिय महोदय,
दर्पण पुस्तिकांचे वाचन केले. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची कल्पना पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी, नागरिक यांना उत्कृष्ठ कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणारी आहे. पोलीस आयुक्तालयातंर्गत येणाऱ्या पो. स्टेश. दाखल गुन्हे, त्यांची थोडक्यात माहिती, तपासाबाबतची माहिती, पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या कामगिरी दर्पण या पुस्तिके मार्फत वाचण्यास मिळाली. दर्पण पुस्तिके मार्फत सेवाहित माहिती पुढे येणाऱ्या पोलीस बांधवांना प्रेरणा देणारी असेल. या पुस्तिकेचा संग्रह होणे आवश्यक आहे असे आवर्जून वाटत आहे. तसेच मा. पोलीस आयुक्त सरांची सदरची संकल्पना दैनंदिन कामकाजाकरिताही उपयोगी ठरेल. धन्यवाद सर.

Mahadik
PN 5991.
स्वाक्षरी

दिनांक :- २९.०५.२०१९


Man arrested for estranged girlfriend's murder attempt
Will act against illegal private security firms, warns police chief
बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हीचे लोकार्पण
बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करून जप्त केली ३५० लिटर दारू
चालक व मालकांवर कारवाई करणार
अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई
शाखेकडून गुंडांची झाडाझडती
वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक
पाच जणांच्या टोळीला अटक
पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत
मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय
धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद
चार किलो गांजासह आरोपीला अटक
कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर
पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास
महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक
पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान
कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष
गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक
पोलीस बांधवांप्रति आदराची भावना बाळगा : अमृत पठारे
पोलिसांसह साजरा झाला 'सी चॉय'
नात्यांमध्ये सुसंवाद ठेवणे आव्हानात्मक
पोलिस ठाण्यांत आता 'सीपीओ'
पोलिस आणि नागरिकांमधील दुवा म्हणून करणार काम; आयुक्तांचा उपक्रम
चोरीला गेलेला मुद्देमाल पुन्हा मिळताच चेहऱ्यावर फुलले हास्य
Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore
सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात
उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच
एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार
नागरिकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार
हरविलेली बालके अखेर विसावली आईच्या कुशीत
Gang duping people with promise of real American dollars nabbed
अशिक्षितांचा पोलिसांवर विश्वास
सोशल मीडियामुळे सापडला हरवलेला
दामिनींनी केले पाकीट परत
एका ढोल ताशा पथकाला मंडळात सहभागी होता येणार
पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे : विसर्जन
सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत
गुन्हेगारी रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक
भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ
विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी
राजेश पुराणिक : रामचंद्र महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रम
हडपसर पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन
हेल्मेटमुळे वाचले वाहतूक पोलिसांचे
आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव
गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे
इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद